कि.दि.अ.क्रं. ०१/२०१८

प्रल्हाद वि. कोणीही नाही

## निशाणी क्रंमाक १ वरील आदेश

१. अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ व ३ प्रमाणे विधी वारसाचे प्रमाणप्रत्र मिळण्याकरीता अर्ज केला.

२. अर्जदारांचे म्हणणे आहे की, उर्मिलाबाई प्रल्हादराव नागपुरे ही दिनांक २०.०३.२०१७ रोजी मौजे बेलखेड, ता. तेल्हारा, जि. अकोला येथे मरण पावले.

३. अर्जदाराने प्रस्तुत प्रकरणा सोबत नि.क्रं. ०७ वर प्रतिज्ञापत्र सादर केले तसेच नि.क्रं. १० प्रमाणे सौ. उर्मिलाबाई प्रल्हादराव नागपुरे हे दिनांक २०.०३.२०१७ रोजी मौजे बेलखेड, ता. तेल्हारा, जि. अकोला येथे मरण पावल्या बाबतचे प्रमाणपत्र अभिलेखावर सादर केले. दिनांक ०७.०२.२०१८ रोजी दैनिक जनमाध्यम वर्तमानपत्रात प्रकाशीत करण्यात आलेली जाहीर नोटीस दर्शविणारे वर्तमानपत्र अभिलेखावर आहे ते नि. क्रं. ०९ वर आहे. आधार कार्डाची व राशन कार्डाची झेरॉक्स प्रत अभिलेखावर आहे. दिनांक ०३.०१.२०१८ रोजी जाहीरनामा काढण्यात आला तो नि.क्रं. ०६ वर आहे. दिनांक ०७.०२.२०१८ रोजीचे वर्तमानपत्रात जाहीर नोटीस प्रकाशीत करण्यात आली. प्रस्तुत प्रकरणात कोणीही अजुनपर्यंत आक्षेप नोंदविला नाही. सबब वरील कागदपत्राचे अनुषंगाने अर्जदार हे मयत उर्मिलाबाई प्रल्हादराव नागपुरे यांचे विधी वारस असल्याचे निष्पन्न होते. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्जदार क्रं. १ प्रल्हाद पुंडलिक नागपुरे, क्रं. २ सौ. सविता रामदास तायडे, क्रं. ३ विजयकुमार प्रल्हाद नागपुरे, क्रं. ४ सौ. स्नेहन अनिल वानखेडे आणि क्रं. ५ सौ. सुनिता रामदास कळस्कार हे मयत उर्मिलाबाई प्रल्हादराव नागपुरे यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत प्रमाणपत्र जारी करण्यात येते.

२. अर्जदाराने नियमानुसार आवश्यक तो मुद्रांक दयावा.

स्वा/-

दिनांक २४.०४.२०१८. (पी.एस.पाटील)

व्यवहार न्यायाधिश क.स्तर, तेल्हारा.

I affirm that the contents of this P.D.F. file are same word for word as per original order.

| | |
|---|---|
| Name of Steno | :- R. C.Bajpai |
| Court Name | :- Civil Judge (J.D.), Telhara. |
| Date | :- 24-04-2018 |
| Signed by Presiding Officer on | :- 24-04-2018 |
| Uploaded on | :- 24-04-2018 |